## विद्यार्थी परिषद निवडणूका महत्त्वाचे मुद्दे

- **संचालक, विद्यार्थी विकास, कुलगुरुबरोबर विचार विनिमय करून निवडणूक कार्यक्रम ३१ जुलै रोजी किंवा त्यापूर्वी घोषित करेल.**
- **शैक्षणिक वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजी किंवा त्या पूर्वी विद्यापीठ विद्यार्थी परिषद घटित करण्यात येईल.**

**विद्यापीठांनी करायवयाची कामे -**

- **विद्यापीठांनी आपापल्या क्षेत्रामधील सर्व प्राचार्यांची कार्यशाळा आयोजित करावी. जेणेकरुन त्यांना नवीन प्रक्रियेची माहिती मिळेल.**
- **विद्यापीठ स्तरावर निवडणूक समिती तयार करावी.**
- **विद्यार्थी संघटनांच्या पदाधिका-यांसाठी देखील स्वतंत्र कार्यशाळा किंवा बैठक आयोजित करावी.**

### निवडणूक लढविण्याकरिता पात्रता

(१) उमेदवार हा, ज्याने महाविद्यालयाने किंवा परिसंस्थेने किंवा विद्यापीठ विभागाने देऊ केलेल्या, विद्यापीठाच्या पूर्ण वेळ मान्यताप्राप्त पाठ्यक्रमासाठी शैक्षणिक वर्षात नोंदणी केलेली आहे व प्रवेश घेतलेला आहे असा पूर्णवेळ नियमित विद्यार्थी असावा.

(२) उमेदवाराने, मागील कोणताही विषय शिल्लक न ठेवता आणि / किंवा सत्र पुढे चालू ठेवण्याची मुभा (एटीकेटी) न घेता अगोदरच्या वर्षाचे सर्व विषय उत्तीर्ण केलेले असले पाहिजेत.

(३) विद्यार्थी हा, एकाच वर्गात पुन: प्रवेश घेतलेला विद्यार्थी नसावा.

(४) निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराची कमाल वयोमर्यादाही, त्या शैक्षणिक वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजी त्यांच्या वयाची पंचवीस वर्षे पूर्ण, एवढी असावी.

## <u>निवडणूक प्रक्रिया</u>

*महाविद्यालय व विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद*

- महाविद्यालयांमध्ये सर्व विद्यार्थी हे विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव वर्गाचा प्रतिनिधी निवडून देतील ( ७४च्या कायद्याप्रमाणे वर्गप्रतिनिधीमधून विद्यापीठ प्रतिनिधी निवडण्याची पध्दती होती.)
- विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेसाठीची व महाविद्यालय विद्यार्थी परिषदेसाठीची निवडणूक, सरळ बहुमताच्या तत्त्वानुसार घेण्यात येईल.
- संबंधित विद्यापीठामध्ये विद्यापीठ विभाग तसेच सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेसाठीची निवडणूक एकाच दिवशी घेण्यात येईल.
- विद्यापीठ विभाग तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, हा वर्ग प्रतिनिधी, अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी यासाठी स्वतंत्रपणे मत देईल. (म्हणजेच त्याला पाच मते देण्याचा हक्क असेल.)
- विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि महाविद्यालय विद्यार्थी परिषद यांच्या निवडणुकीच्या बाबतीत मतमोजणी आणि निकालाची घोषणा मतदानाच्या दिवशीच करण्यात येईल.

*विद्यापीठ विद्यार्थी परिषद - (University Students' Council)*

- विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठीची निवडणूक, एकल हस्तांतरणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार घेण्यात येईल. प्रत्येक मतदारास एक हस्तांतरणीय मत असेल.
- विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद व संलग्नित सर्व महाविद्यालय विद्यार्थी परिषदेतील अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव वर्ग प्रतिनिधी मिळून विद्यापीठ विद्यार्थी संघ (निर्वाचक गण) बनेल. या निर्वाचक गणातून विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीववर्गाचे प्रतिनिधींची निवड केली जाईल.
- महाविद्यालयांतील विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीववर्गाचे प्रतिनिधी आपआपल्या महाविद्यालयातच विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठी मतदान करतील. विद्यापीठ प्रत्येक महाविद्यालयासाठी स्वतंत्र मतदान अधिकारी नेमतील जे बाहेरील जिल्हयातील असतील.
- विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीसाठीची मतमोजणी, मतदानाच्या तिसऱ्या दिवशी सुरु करण्यात येईल आणि मतमोजणीच्या सलग प्रक्रियेनंतर निकाल घोषित करण्यात येईल.

## आचारसंहिता

(१) निवडणुकीच्या प्रयोजनार्थ कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही प्रकारचे उमेदवारांचे पॅनल तयार करण्यात येणार नाही.

(२) वर्गप्रतिनिधीच्या निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवारामागे जास्तीत जास्त रुपये १००० आणि अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी यांच्या निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवारामागे जास्तीत जास्त रुपये ५००० इतका खर्च अनुज्ञेय असेल.

(३) प्रत्येक उमेदवारास निकाल घोषित झाल्यापासून दोन आठवड्यांच्या आत , अनुक्रमाने क्रमांक दिलेल्या प्रमाणकांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह, या आदेशासोबत जोडलेल्या नमुना 'ब' मधील खर्चाचे स्वसाक्षांकित विवरणपत्र निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करावे लागेल.

(४) कोणताही उमेदवार निवडणूक मोहिमेदरम्यान कोणताही धर्म किंवा जात किंवा सामाजिक संघटना किंवा व्यक्ती यांसह कोणत्याही राजकीय पक्षाचे, इतर संघटनेचे व इतर कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही चिन्ह किंवा बोधचिन्ह किंवा छायाचित्र किंवा प्रतिमा यांचा वापर करणार नाही.